जे. एस. एम. कॉलेज, अलिबाग-रायगड.

# विद्यार्थी परिषद निवडणूक कार्यक्रम अधिसूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६. क्रमांक परिनि-२०१८/ प्र.क्र.१०३/ विशि-२.---महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठअधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. अधि. ६) याच्या कलम ७२ चे पोट-कलम (१०) तसेच कलम ९९ च्या पोट-कलम (२) चा खंड (च), पोट-कलम (३) चा खंड (च) व पोट-कलम (४) च्या खंड (ख) च्याउप खंड (पाच) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे उक्त अधिनियमान्वये राष्ट्रीय सेवा योजनेमधील, राष्ट्रीय छात्रसेनेमधील विद्यार्थी परिषदेवरील क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या नामनिर्देशनाशी संबंधीत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ(राष्ट्रीय सेवा योजनेतील, राष्ट्रीय छात्रसेनेतील, विद्यार्थी परिषदेवरील क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमधील विद्यार्थ्यांचे नामनिर्देशन) एकरूप परिनियम, २०१८, या नुसार विद्यार्थी परिषदेवर नियुक्ती करण्यासाठी नामनिर्देशन पत्र मागविण्यात येत आहेत. राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतीक उपक्रम, क्रिडा उपक्रमात सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांना नामनिर्देशन पत्र दाखल करता येईल.

नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे.

| तपशील | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रिडा आणि सांस्कृतिक कार्य यामधून महाविद्यालय विभाग विद्यार्थी परिषदेकरीता नामनिर्देशन मागविण्यासंदर्भात सूचना प्रसिध्द करणे | ०९ ऑगस्ट २०१९ | सकाळी ११:०० वाजता | जे. एस. एम. महाविद्यालय अलिबाग. (कार्यालय) |
| राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रिडा आणि सांस्कृतिक कार्य यामधून विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेकरीता नामनिर्देशन मागविण्याची अंतिम तारीख | १४ ऑगस्ट २०१९ | दुपारी ०४:०० वाजेपर्यंत | जे. एस. एम. महाविद्यालय अलिबाग.(कार्यालय) |
| नामनिर्देशन अर्जाची छाननी | १६ ऑगस्ट २०१९ | सकाळी ११:०० वाजता ते दुपारी ०४:०० वाजेपर्यंत | जे. एस. एम. महाविद्यालय (कॉन्फरन्स हॉल)अलिबाग. |
| नामनिर्देशन अर्जाची सविस्तर माहितीसह स्थळप्रत सादर करण्याची अंतिम तारीख | २० ऑगस्ट २०१९ | दुपारी ०४:०० वाजेपर्यंत | जे. एस. एम. महाविद्यालय अलिबाग. |
| राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रिडा आणि सांस्कृतिक कार्य यामधून महाविद्यालय विद्यार्थी परिषदेकरीता नामनिर्देशनाची घोषणा | ३१ ऑगस्ट २०१९ | दुपारी ०४:०० नंतर | जे. एस. एम. महाविद्यालय अलिबाग. |

नामनिर्देशन पत्राचा नमुना कार्यालयात निवडणूक अधिकारी यांचेकडे सकाळी १०:३० ते ०१:३० या वेळेत उपलब्ध होईल.

पूर्ण भरलेले नामनिर्देशन पत्र दिलेल्या वेळेत कार्यालयात निवडणूक अधिकारी यांचेकडे समक्ष सादर करावेत निवडणूक लढवण्यासाठी पात्रता, निवडणूक लढवण्याठी अनर्हता या संबंधीची माहिती सोबतच्या सूचनेत लावली आहे. तसेच निवडणूकी संबंधीचे महाराष्ट्र शासनाचे परिनियम मुंबई विद्यापीठाच्या http://mu.ac.in/portal/gateway-fortal/department-of-students-welfares/ वेब साईटवर उपलब्ध आहेत.

दि. ०९ ऑगस्ट २०१९

J. S. M. ALIBAG COLLEGE

निवडणूक अधिकारी

Scanned by CamScanner

जे. एस. एम. कॉलेज, अलिबाग-रायगड.

# विद्यार्थी परिषद निवडणूक लढविण्याकरिता पात्रता व अनर्हता

- **पात्रता**

(१) उमेदवार हा, ज्याने महाविद्यालयाने किंवा परिसंस्थेने किंवा विद्यापीठ विभागाने देऊ केलेल्या, विद्यापीठाच्या पूर्णवेळ मान्यताप्राप्त पाठ्यक्रमासाठी शैक्षणिक वर्षात नोंदणी केलेली आहे व प्रवेश घेतलेला आहे असा पूर्णवेळ नियमित विद्यार्थी असावा.

(२) उमेदवाराने, मागील कोणताही विषय शिल्लक न ठेवता आणि / किंवा सत्र पुढे चालू ठेवण्याची मुभा (एटीकेटी) न घेता अगोदरच्या वर्षाचे सर्व विषय उत्तीर्ण केलेले असले पाहिजेत.

(३) विद्यार्थी हा, एकाच वर्गात पुनः प्रवेश घेतलेला विद्यार्थी नसावा.

(४) निवडणूक लढविण्यासाठी उमेदवाराची कमाल वयोमर्यादा ही, त्या शैक्षणिक वर्षाच्या ३० सप्टेंबर रोजी त्यांच्या वयाची पंचवीस वर्षे पूर्ण,एवढी असावी.

(५) राखीव प्रवर्गाच्या प्रतिनिधीसाठी निवडणूक लढवू इच्छिणाया उमेदवाराकडे निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी सक्षम प्राधिकायाने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे.

- **अनर्हता.---जर एखाद्या विद्यार्थ्याने,----**

(१) उच्च शिक्षणासाठी पहिल्यांदा प्रवेश घेतल्यापासून सात शैक्षणिक वर्षे पूर्ण केलेली असतील; किंवा

(२) त्यास कोणत्याही विद्यापीठ परीक्षेतील गैरप्रकारामध्ये गुंतल्यामुळे किंवा कोणतीही गैरवर्तणूक केल्यामुळे सक्षम प्राधिकायाने शिक्षा केलेली असेल ; किंवा

(३) त्यास नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असणाया कोणत्याही अपराधाकरिता दोषी ठरविलेले असेल,----

तर तो विद्यार्थी परिषदेचा सदस्य असण्यास हक्कदार असणार नाही.

दि. ०९ ऑगस्ट २०१९

J. S. M. ALIBAG COLLEGE

निवडणूक अधिकारी

Scanned by CamScanner